# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र



०७१८४ - २५४७०२ sp.bhandara@gov.in / pilcb.bhandara@gov.in


जा.क्र. जनसंपर्क कक्ष/वार्तापत्र/ 581 /पोलीस अधिक्षक कार्यालय भंडारा, दिनांकः- २९/१०/२०१८

## "स्वतंत्र भारताचे पहिले गृहमंत्री सरदार वल्लभभाई पटेल यांचे जयंती निमीत्त व शहिद पोलीस जवानांचे स्मृती प्रित्यर्थ भंडारा जिल्हा पोलीस दला तर्फे एकता दौड व सद्भावणा दौड चे आयोजन"

**दिनांक ३१/१०/२०१८ रोजी पहाटे ५.०० वा. संपन्न होणार.**

भंडारा :- दिनांक ३१/१०/२०१८ रोजी स्वतंत्र भारताचे पहिले गृहमंत्री सरदार वल्लभभाई पटेल यांचे जयंती निमीत्त व शहिद पोलीस जवानांचे स्मृती प्रित्यर्थ भंडारा जिल्हा पोलीस दला तर्फे एकता दौड व सद्भावणा दौड चे आयोजन दिनांक ३१/१०/२०१८ रोजी करण्यात आले आहे. भंडारा शहरातील व जिल्हयातील तमाम नागरीकांनी तसेच जिल्यातील सर्व वार्ताहर, पत्रकार त्याच प्रमाणे वत्तवाहीण्यामध्ये काम करणारे बंधुना एकता दौड व सद्भावणा दौड मध्ये सामील होण्याचे आवाहन श्रीमती विनीता साहू मा. पोलीस अधीक्षक, जिल्हा भंडारा व भंडारा जिल्हा पोलीस दला तर्फे करण्यात येत आहे. दिनांक ३१/१०/२०१८ रोजी सकाळी ५.०० वा. कवायत मैदान पोलीस मुख्यालय भंडारा येथुन प्रमुख पाहुण्यांचे हस्ते हिरवी झेंडी दाखवुन एकता दौड व सद्भावणा दौड सुरू होणार असुन यामध्ये १८ वर्षा वरील पुरूष खुला गट हे १० कि.मी. करीता नांव नोंदणी करू शकतात. त्याकरीता त्रिमुर्ती चौक - बसस्टॅड - गांधी चौक - शास्त्री चौक - शासकीय तंत्रनिकेतन - गणेशनगर ले आउट तेथुन परत त्याच मार्गे पोलीस मुख्यालय अशी मार्गीका ठरवण्यात आली आहे. १८ वर्षा वरील महिला खुला गट हे ५ कि.मी. करीता नोंदणी करू शकतात. त्याकरीता पोलीस मुख्यालय त्रिमुर्ती चौक - शास्त्री चौक - आयएमए हॉल व तेथुन त्याच मार्गे पोलीस मुख्यालय परत अशाप्रकारे मार्गीका ठेवण्यात आली आहे. पोलीस अधिकारी व कर्मचारी ३ कि.मी. एकता दौड करीता नांव नोंदणी करू शकतात. त्यांचेकरीता पोलीस मुख्यालय त्रिमुर्ती चौक - शास्त्री चौक व तेथुन पोलीस मुख्यालय परत अशा पध्दतीने मार्गीका आखण्यात आलेली असुन नागरीकांना/स्पर्धकांना नाव नोंदणी करण्याकरीता स्पर्धक पोलीस नियंत्रण कक्ष भंडारा संपर्क क्रमांक ०७१८४-२५२४००, पोलीस स्टेशन भंडारा संपर्क क्रमांक ०७१८४-२५२३०३ येथे कधीही तर चैतण्य व्यायाम शाळा पोलीस मुख्यालय भंडारा या ठिकाणी सकाळी ०६.०० ते १०.०० व संध्याकाळी १७.०० ते १९.०० या वेळेत नोंदणी करू शकतात त्याच प्रमाणे व्हॉट्सअॅप क्रमांक ९४०५८३११०० व भंडारा पोलीसांचे अधिकृत फेसबुक व ट्वीटर अकाउंटवर नांव नोंदणी करू शकतात. विजयी उमेदवारांना मान्यवरांचे हस्ते प्रथम, द्वितीय व तृतीय पारीतोषीके व प्रशस्तीपत्रके देण्यात येतील.

तरी जास्तीत जास्त संख्येने नागरीकांनी एकता दौड व सद्भावणा दौड मध्ये सहभागी व्हावे असे आवाहन भंडारा जिल्हा पोलीस दला तर्फे करण्यात येत आहे.

(जितेद्रं के आडोळे)
पोलीस उपनिरीक्षक
जनसंपर्क अधिकारी
संपर्क क्र. ९४०३१०९७२०

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.